सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ९ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# आकाशात मोठा स्फोट झाला आणि विमान कोसळले

## राजस्थानमध्ये मोठा विमान अपघात; दोन ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९चुरु राजस्थान**

राजस्थानमधील चुरू जिल्ह्यात एक मोठा विमानअपघात झाल्याचं वृत्त आलं आहे. चुरू जिल्ह्यातील रतनगड क्षेत्रात असलेल्या भानूदा गावात हा विमानअपघात झाला असून, या अपघाताबाबत स्थानिक नागरिकांनी माहिती दिल्यानंतर प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली आहे. अपघातग्रस्त विमान हे हवाई दलाचं असल्याची



प्राथमिक माहिती मिळत असून, घटनास्थळाजवळून दोन मृतदेहही सापडले आहेत.

या अपघातातबाबत स्थानिकांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार आकाशात मोठा स्फोट झाल्यानंतर हे विमान गावाजवळ असलेल्या शेतामध्ये कोसळले. त्यानंतर अपघातस्थळावरून आगीच्या ज्वाळा आणि धूराचे लोट हवेत उसळताना दिसले. ग्रामस्थांनी अपघातग्रस्त विमानाला लागलेली आग शमवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात यश आलं नाही. दरम्यान, हे लढाऊ विमान भारतीय हवाई दलाकडील जग्वार प्रकारातील लढाऊ विमान असल्याची माहिती समोर आली आहे.

अपघातग्रस्त विमानाजळ दोन मृतदेह सापडले आहेत . त्यातीत एक मृतदेह हा पूर्णपणे छिन्नविच्छिन्न स्थितीत असून, या मृतदेहाची ओळख पटवण्याचं काम प्रशासनाकडून सुरू आहे. दरम्यान, विमान अपघाताची माहिती मिळाल्यानंतर रतनगडमधील प्रशासनामध्ये खळबळ उडाली आहे. तसेच वरिष्ठ पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आहे.

# परख सर्वेक्षण अहवाल जाहीर

## पंजाब,केरळ पहिल्या क्रमांकावर असून, महाराष्ट्र आठव्या क्रमांकावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९मुंबई**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून महाराष्ट्रातील शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यात आलं आहे. त्यानुसार शाळांचं मूल्यांकन करण्यासाठी परख ही राष्ट्रीय मूल्यांकन संस्था स्थापन करण्यात आली. परखनं केलेल्या शैक्षणिक सर्वेक्षणात देशातील राज्यांनी सहभाग घेतला होता. देशातील राज्यांनी केलेल्या कामगिरीनुसार पंजाब आणि केरळ पहिल्या क्रमांकावर असून, महाराष्ट्र आठव्या क्रमांकावर आहे. तर इयत्ता तिसरीच्या



विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणानुसार तिसरी इयत्तेनुसार महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर असून, इयत्ता सहावी आणि नववी या इयत्तांच्या सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र अनुक्रमे सातव्या आणि दहाव्या क्रमांकावर आहे. तसंच या सर्वेक्षणानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थी सर्वाधिक हुशार असल्याचं आढळून आलं आहे.

चार डिसेंबर २०२४ ला परख संस्थेकडून देश पातळीवर शैक्षणिक सर्वेक्षण करण्यात आलं होतं . या सर्वेक्षणामध्ये इयत्ता तिसरी, सहावी व नववीच्या विद्यार्थ्यांचं सर्वेक्षण करण्यात आलं. महाराष्ट्रातील ४ हजार ३१४ शाळांमधील १३ हजार ९३० शिक्षक आणि एक लाख २३ हजार ६९ विद्यार्थ्यांनी या सर्वेक्षणात भाग घेतला. या सर्वेक्षणातून इयत्ता तिसरी, सहावी आणि नववी या इयत्ता मधील विद्यार्थ्यांचे भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि परिसर अभ्यास या विषयांसाठीचे मूल्यांकन करण्यात आलं. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण २०२१ पेक्षा परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ मध्ये इयत्ता नववीतील गणित विषय वगळता सरासरी संपादणूक यामध्ये तीन टक्के वाढ झाली आहे हे स्पष्ट होत आहे. या सर्वेक्षणात राज्य सरकारच्या शाळांनी काही जिल्ह्यांमध्ये उत्तम कामगिरी केली आहे. मात्र एकूण शालेय सुधारणा आवश्यक असल्याचं या सर्वेक्षणातून निष्पन्न झालं आहे.

# मराठी पत्रांना आता मराठीतूनच उत्तर मिळणार

## केंद्रीय गृह मंत्रालयाचा निर्णय : प्रादेषिक भाषांना बळकटी देण्याचे केंद्र शासनाचे प्रयत्न




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली**

राज्यात सध्या मराठी विरुद्ध हिंदी असा वाद सुरु आहे. अशातच आता केंद्रीय गृह मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला आहे. आता मराठी भाषेत पाठवलेल्या पत्रांना मराठीतूनच उत्तर दिलं जाणार आहे. संसदीय राजभाषा समितीच्या बैठकीत समितीचे निमंत्रक खासदार डॉ. दिनेश शर्मा यांनी ही माहिती दिली आहे.

याबाबत बोलताना डॉ. दिनेश शर्मा म्हणाले की, राजभाषा समिती देशातील प्रादेशिक भाषांना चालना देणे, हिंदी भाषेला सहयोगी भाषा म्हणून प्रस्थापित करणे यासाठी काम करत आहे. सध्या गृह मंत्रालयातील संपूर्ण कामकाज हिंदी भाषेत होत आहे, मात्र यापुढे मराठी भाषेतील पत्रांना मराठी भाषेतूनच उत्तर देण्यात येईल. तसेच तामिळ भाषेतील पत्रांना तामिळमधूनच उत्तर दिले जाईल.

यावेळी बोलताना राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी म्हटले की, ‘तामिळनाडूमध्ये आज परिस्थिती बदलली आहे. बहुतांशी लोक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांमध्ये पाठवत आहेत, तिथे हिंदी ही द्वितीय भाषा म्हणून शिकवली जाते. त्यामुळे तेथील मुले उत्तम हिंदी समजतात व बोलू शकतात.

पुढे बोलताना सीपी राधाकृष्णन म्हणाले की, मी झारखंडमध्ये राज्यपाल असताना हिंदीशिवाय लोकांशी संवाद साधता येत नव्हता. मला आज आपल्याला हिंदी पूर्ण समजते. मी राज्यातील विद्यापीठांमध्ये जर्मन, जपानी, मँडरिन, या विदेशी भाषा देखील शिकविल्या जाव्या अशा सूचना विद्यापीठांना केल्या आहेत.

दरम्यान, या बैठकीला, राजभाषा समितीचे सदस्य खा. रामचंद्र जांगडा, खा. राजेश वर्मा, खा. कृतिदेवी देवबर्मन, खा. किशोरीलाल शर्मा, खा. सतपाल ब्रह्मचारी, खा, डॉ अजित गोपछडे, खा. विश्वेश्वर हेगडे (कर्नाटक) आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री फडणवीसांनी आ.संजय गायकवाड यांना सुनावले

## आमदार निवासमधील कर्मचाऱ्याला मारहाण प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

आमदार निवासातील कँटिनमध्ये शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी गोंधळ घातला. जेवण खराब असल्याच्या मुद्द्यावरून त्यांनी थेट कँटिनमधील कर्मचाऱ्याला जबर मारहाण केली. आमदार गायकवाड यांच्या या कारनाम्याचा मुद्दा विधान परिषदेत शिवसेनेचे (यूबीटी) आमदार अनिल परब यांनी उपस्थित केला. त्यांनी संजय गायकवाड यांचे निलंबन करण्याचीच मागणी केली. या



प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नाराजी व्यक्त करत कानउघाडणी केली. त्यांनी अध्यक्षांना या प्रकरणाची दखल घेऊन काय कारवाई करायची ती करावी, अशी भूमिका मांडली.

विधान परिषदेत संजय गायकवाड यांच्या मारहाणीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी त्याची माहिती घेतली आणि तो व्हिडीओ मी स्वतः बघितला आहे. अशा प्रकारचे वर्तन आपल्या कुणासाठीही भूषणावह नाही. याच्याने विधिमंडळाची आणि आपल्या सगळ्यांची आणि आमदारांची प्रतिष्ठा, प्रतिमा कमी होते.

**आमदारांबद्दल लोकांच्या मनात चुकीची भावना जाते**

अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधीने मारहाण करणे आणि त्याचे व्हिडीओ येणे. टॉवेलवर येऊन मारलं किंवा कसेही मारले तरी ते चुकीचेच आहे. योग्य नाहीये. यातून सगळ्या आमदारांबद्दल लोकांमध्ये चुकीची भावना जाते, असे म्हणत फडणवीसांनी खंत व्यक्त केली.आपण सत्तेचा गैरवापर करतोय किंवा आमदार म्हणून आपलं वर्तन योग्य नाही, असे लोकांना वाटेल. ही गंभीर बाब आहे. अध्यक्षांनी याची दखल घ्यावी आणि यासंदर्भात काय कारवाई करायची, ती करावी, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषद अध्यक्ष आणि विधानसभा अध्यक्षांना केली.

# मुंबईतील कर्नाक पुलाचं नाव आता ’सिंदूर पूल’, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्या होणार लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

दक्षिण मुंबईतील पुनर्बांधणी करण्यात आलेल्या कर्नाक उड्डाणपुलाचं नाव आता मुंबई महानगरपालिकेकडून बदलण्यात आलं आहे. या पुलाचं ’सिंदूर’ असं नामकरण करण्यात आलं आहे. दरम्यान, काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला जशास तसं उत्तर देण्यासाठी भारतीय लष्करानं ’ऑपरेशन सिंदूर’ या मोहिमेद्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्धवस्त केले होते. त्यामुळं कर्नाक या उड्डाणपुलाला दिलेलं



’सिंदूर’ हे नाव भारतानं पाकिस्तानविरुद्ध केलेल्या लष्करी कारवाईपासून प्रेरित असल्याचं महानगरपालिकेनं म्हटलं आहे. तसंच, या पुलाचं लोकार्पण गुरुवारी (१० जुलै) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनानं दिली आहे.


पूर्वेला आणि पश्चिमेला जोडणारा हा पूल पूर्वी कर्नाक ब्रीज म्हणून ओळखला जात असे. १८३९ ते १८४१ काळातील मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर जेम्स रिव्हेट कर्नाक यांच्या नावावरून सदर पुलाला कर्नाक ब्रीज असं नाव देण्यात आलं होतं. आता भारतीय लष्कराच्या ’ऑपरेशन सिंदूर’ नंतर या पुलाचं नाव ’सिंदूर पूल’ असं ठेवण्यात आलं आहे. हा सिंदूर उड्डाणपूल मस्जिद बंदर रेल्वे स्थानकाजवळ आहे. तो पी डी’मेलो रोडला जोडतो. सदर पूल दक्षिण मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम भागांना जोडतो. आता या पुलावरून दोन्ही बाजूंनी वाहतूक शक्य होणार आहे. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या नेतृत्वाखाली अभियंत्यांनी हा पूल बांधला आहे.

पुलाची एकूण लांबी ३२८ मीटर असून, ७० मीटर पूल रेल्वे हद्दीत आहे. पुलावर दोन स्टील गर्डर असून, प्रत्येक गर्डरचे वजन ५५० मेट्रिक टन इतकं आहे. हे गर्डर ७० मीटर लांब, २६.५ मीटर रुंद आणि १०.८ मीटर उंच असून, ते आरसीसी खांबांवर बसवले आहेत.

# ‘पुण्यात एक कॉकटेल फॅमिली’ ; आमदार गोपीचंद पडळकरांची नाव न घेता पवार कुटुंबावर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९पुणे**

आपल्या वादग्रस्त विधानांमुळं नेहमी चर्चेत असणारे भारतीय जनता पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी मंगळवारी नाव न घेता पवार कुटुंबावर टीका केली. माझ्या विरोधात जे काही मोर्चे काढले जात आहेत. त्यात एका गटाचे लोक पुढं आहेत. एकादशीच्या दिवशी दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात मटण खाऊन जातात. त्यांची सासू ख्रिश्चन आहे, नवरा ब्राह्मण



आहे, बाप मराठा आहे, अशी कॉकटेल फॅमिली आहे. ती फॅमिली माझी आमदारकी गेली पाहिजे म्हणून मोर्चामध्ये सहभागी होते, असं म्हणत आमदार गोपीचंद पडळकर यांनी नाव न घेतं पवार कुटुंबावर टीका केली.

पवार कुटुंबावर नाव न घेता टीका : सांगलीमधील ऋतुजा पाटील प्रकरणात राजगे कुटुंबीयांनी हिंदू असल्याचं भासवून लग्न केलं. लग्नानंतर धर्मांतर करण्यासाठी राजगे कुटुंबीयांनी ऋतुजाचा अनन्वित छळ केला. सततच्या छळाला वैतागून ७ महिन्यांच्या गरोदरपणात धर्माभिमानी ऋतुजानं आत्महत्या केली. धर्मांतराचा कठोर कायदा व्हावा, राजगे कुटुंबाला कठोर शिक्षा व्हावी यासाठी पुण्यात हिंदूच्या भव्य मोर्चाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पडळकर उपस्थित होते. यावेळी भाषण करताना त्यांनी पवारांचं नाव न घेता टीका केली. एकादशीच्या दिवशी दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात मटण खाऊन जातात. त्यांची सासू ख्रिश्चन आहे, नवरा ब्राह्मण आहे, बाप मराठा आहे, अशी कॉकटेल फॅमिली आहे. ती फॅमिली माझी आमदारकी गेली पाहिजे म्हणून मोर्चामध्ये सहभागी होते, असं म्हणत त्यांनी पवार कुटुंबावर टीका केली.

# शिर्डीमध्ये गुरुपौर्णिमा उत्सवाला सुरुवात; साई मंदिराला फुलांची आकर्षक सजावट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९शिर्डी**

शिर्डीत साईबाबा संस्थानच्या वतीनं साई मंदिरात तीन दिवस साजरा करण्यात येणाऱ्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या पहिल्या दिवसाची सुरुवात आज भक्तिभावाने करण्यात आली. यानिमित्ताने भाविकांच्या देणगीतून साई मंदिरासह संपूर्ण परिसराला विद्युत रोषणाई आणि रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली.




साईबाबांच्या समाधी मंदिरासह द्वारकामाई, गुरुस्थान आणि चावडी या मंदिरात, ’अनथोरियम’, ’कार्निशन’, ’डच गुलाब’, ’लिलियम’, ’सूर्यफूल’ आदी विविध प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांची सजावट करण्यात आली. विशेष म्हणजे बंगळुरूहून नारळाच्या झावळ्या आणून त्याच्या विविध प्रकारच्या टोपल्या तयार करण्यात आल्यात. त्या रंगीबेरंगी फुलांनी सजवण्यात आल्यात. यासाठी तब्बल पाच टन फुलांचा वापर करण्यात आल्याची माहिती रामदास बांगर यांनी दिली.

साई मंदिराला फुलांची सजावट करण्यासाठी २० ते ३० कारागीरांनी चार दिवसांपासून रात्रंदिवस मेहनत घेतली. आज प्रसन्न मनाने भाविक जेव्हा साई मंदिरात येत आहेत, तेव्हा त्यांच्या नजरेस फुलांची देखणी सजावट मन मोहून टाकणारी ठरत आहे. या फुलांच्या सजावटीबरोबरच मुंबई येथील साईराज डेकोरेटर्स यांच्या देणगीतून दरवर्षीप्रमाणे यंदाही साईबाबा मंदिरासह परिसरात लक्षवेधी विद्युत रोषणाई करण्यात आलीय.

## संपादकीय ......

# 'भाजप'समोर आव्हान

'शत-प्रतिशत भाजप' हे पक्षाचे उद्दिष्ट, तळकोकणात वाढत असलेली शिंदे शिवसेनेची ताकद आणि भाजप व शिवसेना या दोन्ही मित्र पक्षांच्या नेत्यांमध्ये झालेल्या टीका-टिप्पणीमुळे भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना आपल्या मातृभूमी असलेल्या तळकोकणातच राजकीय वाटचाल करताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. त्यात पुन्हा येणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही दोन्ही मित्र पक्षांची युती कायम ठेवण्यासाठीही त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे.

कोकण प्रांतावर भाजपला वर्चस्व मिळवायचे आहे, हे काही लपून राहिलेले नाही. भाजप-शिवसेनेची २५ वर्षे युती असताना शिवसेनेकडे असलेला कोकण आपल्याकडे खेचण्यासाठी भाजपने कसोशीने प्रयत्न केला. काही भागात भाजपला त्यात यशही मिळाले; परंतु कोकणात अधिकतर प्रभाव शिवसेनेचा राहिला. राणे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर भाजपच्या आशा पल्लवित झाल्या. त्यात पुन्हा शिवसेनेत फूट पडल्यानंतर भाजप पक्ष आणखी पुढे सरकला. खासदार नारायण राणे भाजपमधून निवडून आल्यानंतर भाजपचे तळकोकणातील वर्चस्व वाढले; परंतु विधानसभा निवडणुकीत पुन्हा शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने बर्यापैकी मजल मारली. एकेकाळी ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील अखंड शिवसेनेचा प्रभाव कोकणच्या राजकारणावर होतो; परंतु फूट पडल्यानंतर ठाकरेंची शिवसेना बॅकफूटवर गेली आहे. ती जागा व्यापून टाकण्यासाठी अर्थातच भाजप आणि शिंदे शिवसेनेमध्ये अंतर्गत स्पर्धा सुरू झाली. त्यात शिंदे यांच्या शिवसेनेकडून अधिक मतदारसंघांत आमदार निवडून आले आहेत. त्या-त्या मतदारसंघात ताकदीने संघटना वाढविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून दिसतो आहे.

अशावेळी कणकवली विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार हे मंत्री नितेश राणे आहेत. त्यांनी आपला मतदारसंघ भाजपमय केला आहे. तिथे शिंदे शिवसेनेला फारशी संधी दिसत नाही. मंत्री नितेश राणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातही भाजपचे नेटवर्क विस्तारण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यात पुन्हा आता सिंधुदुर्गचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांच्याकडे भाजप प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी आली आहे. त्यामुळे त्यांच्या मातृभूमीत भाजपचे संघटन वाढविण्याची जबाबदारीही आपसूकच आली आहे. किंबहुना कोकणात भाजपचे वर्चस्व निर्माण करण्यासाठीच रवींद्र चव्हाण यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्याचे म्हटले जाते. अर्थात, भाजप श्रेष्ठींकडूनही तशीच अपेक्षा असणार आहे.

रवींद्र चव्हाण तसे गेली दहा वर्षे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय आहेत; परंतु आता केंद्रात आणि राज्यातही भाजपची सत्ता असताना त्यांना कोकण प्रांत काबीज करावा लागणार आणि तसे आव्हान त्यांच्या समोर आहे. त्यात पुन्हा कोकणात संघटन विस्तारण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत असलेल्या शिंदे शिवसेनेशी जुळवून घ्यावे लागणार आहे. अलीकडेच मंत्री भरत गोगावले यांनी नारायण राणे यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली; परंतु दरम्यान भाजपच्या स्थानिक पदाधिकार्यांनी ज्याप्रकारे गोगावलेंवर हल्लाबोल केला, ते पाहता शिंदे शिवसेना मित्र पक्ष असला, तरी त्यांची कोणतीही चूक खपवून न घेण्याची भूमिका भाजपची आहे, हे स्पष्ट झाले.

सत्तेत एकत्र असले, तरी संघटन वाढविताना होणार्या स्पर्धेतून संघर्ष आणि असे वाद ज्या-ज्यावेळी होतील त्या-त्यावेळी रवींद्र चव्हाण यांना ते वाद मिटवावे लागणार आहेत. किंबहुना सत्तेतील महायुती टिकवून ठेवण्यासाठी टोकाची भूमिका घेता येणार नाही. रवींद्र चव्हाण लवकरच सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आणि कोकणचा दौरा करणार आहेत. या दौर्यात त्यांची पुढील वाटचाल कशी असेल, याचे संकेत मिळतीलच; परंतु त्याचबरोबर लवकरच होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ते भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांचे कसे समाधान करतात आणि कशी 'स्ट्रॅटेजी' वापरतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# गडगडेश्वर प्रभागातील समस्यांना वाचा फोडण्यासाठी लोटांगण आंदोलन

## प्रभाकर वाळसे यांचे मनपा प्रशासनाला निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** गडगडेश्वर प्रभाग अमरावती येथील नागरीकांच्या समस्येच्या न्याय हक्का साठी सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर वाळसे यांच्या नेतृत्वात अमरावती महानगर पालिका कार्यालयावर लोटांगण आंदोलन करण्यात आले.अमरावती महानगर पालिका क्षेत्राअंतर्गत असलेल्या गडगडेश्वर मंदीर प्रभागातील संपूर्ण नागरिकांना होत असलेल्या समस्यांमुळे जिवन जगणे कठीण झाले आहे. सदर परिसर हा अंबादेवी मंदीरालगत असून हा ऐतिहासीक परिसर आहे.



मात्र या परिसरातील नागरीकांना स्वच्छतेसह अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे परिसरातील नागरीकां मध्ये मनपाच्या कारभाराविषयी रोष निर्माण झाला आहे. गडगडेश्वर प्रभागातील नागरीकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी प्रभाकर वाळसे यांच्या नेतृत्वात राजकमल चौक ते महानगर पालिकेच्या कार्यालयापर्यंत लोटांगण आंदोलन करण्यात आले. यानंतर वाळसे यांच्या नेतृत्वात मनपा आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले.गडगडेश्वर परिसरात साफसफाई अभियान राबविण्यात यावे. गेल्या अनेक वर्षापासुन झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांना पीआर कार्ड देण्यात यावे. साहित्यसमाट अण्णाभाऊ साठे पुतळयाचा प्रश्न त्वरीत निकाली काढण्यात यावा. आदी मागण्यांचे निवेदन यावेळी देण्यात आले. यावेळी प्रभाकर वाळसे यांच्यासमवेत देवानंद वानखडे, प्रमोद खंडारे, दिनेश स्वर्गे, दिलीप प्रधान, श्रावण वाघमारे, मुन्ना वाघमारे, अर्जुन इंगोले, महेश लोंढे आदी उपस्थित होते.

# कोंबडी कापण्याच्या सुरीने पत्नीची गळा चिरून हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक, पुसद दि.९.** वसंत नगरातील टिपू सुलतान चौका लगत राहत्या घरी पतीने पत्नीचा कोंबडी कापण्याच्या सुरीने गळा चिरून हत्या केली. त्यानंतर पत्नीला ठार मारणाऱ्या पतीने स्वतःहून पोलिस ठाण्यात जाऊन समर्पण केले आहे. हि घटना मंगळवारी दि. ८ जूनला पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. खुनाच्या घटनेने परिसरामध्ये एकच खळबळ उडाली आहे. सानिया मोहम्मद आसिफ कुरेशी (वय २२) वर्ष रा. टिपू सुलतान चौक असे खून झालेल्या नवविवाहित महिलेचे नाव आहे. तर आसिफ शफी कुरेशी (वय २८) वर्ष रा. टिपू सुलतान चौक असे मारेकरी पतीचे नाव आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, आसिफ व सानिया यांचे सुमारे दोन वर्षांपूर्वी रिती रिवाजाप्रमाणे विवाह झाला होता. आसिफ कोंबडीच्या दुकानात कोंबड्या कापून त्या विकून उदरनिर्वाह करीत होता. कंधार तालुक्यातील सांवर येथून पुसदला विवाह करून आल्यानंतर त्यांच्यात कुठल्या ना कुठल्या कारणाने नेहमीच वाद होत होता. सततच्या भांडणाला कंटाळून सानिया माहेरी गेली होती. अशातच दोन-तीन दिवसापूर्वी समाजातील काही लोकांनी तिला समजूत काढली होती व पतीच्या येथे पाठवले होते. घटनेच्या काही तासापूर्वी पती-पत्नीमध्ये वाद झाला होता. त्यानंतर मारहाण करीत पत्नीला सुरीने गळ्यावर मारून तिला सोडल्याने तिचा जागीच तडफडून मृत्यू झाला होता.

# टोमॅटो पिकाचे ७० टक्के नुकसान करणाऱ्या किडीवर नियंत्रण कसे मिळवाल?

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक**

अनेक भागातखरिपातील टोमॅटो लागवड झाली असून काही भागात लागवडीची तयारी सुरु आहे. तर काही भागात फळधारणा स्थितीत टोमॅटो पिकावर फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होत असल्याचे दिसून येत आहे. आजच्या भागातून या अळीचे व्यवस्थापनकसे करावे, हे पाहुयात....




**नुकसानीचा प्रकार**

अळी सुरवातीला कोवळी पाने खाते तसेच कोवळया वाढणाऱ्या फांद्या कुतुंडून खाते. फळे लागल्यानंतर अळी फळांना छिद्र पाडून आत डोके खुपसुन आतील भाग खाते. एक अळी ही २ ते ८ फळांचे नुकसान करू शकते. जवळपास ही कीड पिकाचे ७० ते ८० टक्के नुकसान करू शकते.

**एकात्मिक व्यवस्थापन**

कोळपणी व निंदणी करून शेत तणविरहित ठेवावे.

प्रादुर्भावग्रस्त फळे तोडून नष्ट करावीत. मोठया अळया हातानी वेचून नष्ट कराव्यात.

भक्षक पक्षांना बसण्यासाठी शेतात ८ ते १० प्रति एकरी पक्षी बांचे उभारावेत.

सर्वेक्षणासाठी शेतात हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत.

लागवडीनंतर ४०-४५ दिवसांनी शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस हे मित्रकीटक १.५ लाख अंडी प्रति हेक्टर या प्रमाणात ७ दिवसांच्या अंतराने ५ ते ६ वेळा सोडावेत.

फळे पोखरणारी अळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन. पी.व्ही. ५०० एल.ई. विषाणूची प्रति हे. फवारणी करावी. म्हणजेच ५०० एल.ई. विषाणू (५०० मि.ली.) ५०० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये ५०० मि.ली. चिकट द्रव (स्टिकर) आणि राणीपाल (नीळ) २०० ग्रॅम टाकावा.

५ टक्के निंबोळी अर्क किंवा कडूनिंब आधारित झाडिरेक्टीन (३००० पीपीएम) २ मि.लि प्रति लिटर प्रमाणे फवारणी करावी.

विव्हेरिया बंसियाना १ टक्के विद्राव्य पावडर ६ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी.

बी. टी. जिवाणूजन्य किटकनाशक २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणात करावी.





शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास, खालील रासायनिक कीटकनाशकाची फवारणी.

कीटकनाशक : प्रति लिटर पाणी

किनालफॉस २५ ईसी किंवा २ मिली

क्लोरेंन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी किंवा ०.३ मिली

सायनाट्रानीलीप्रोल १०.२६ ओडी किंवा १.८ मिली

फ्लुबेडामाईड २० डब्लूजी किंवा ०.५ ग्रेम

इंडोक्झाकार्ब १४.५ एससी ०.८ मिली

वरील कीटकनाशकाचे प्रमाण साध्या पंपासाठी आहे, पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे.

**- कृषि कीटकशास्त्र** विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

# वजनापासून त्वचेपर्यंत फायदे मिळवायचे आहेत? तर मग रोज सकाळी रिकाम्या पोटी प्या ब्लॅक कॉफी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**




सकाळची सुरुवात गरमागरम कॉफीने करणाऱ्यांची संख्या कमी नाही. अनेकांसाठी हा केवळ झोप उडवण्याचा एक मार्ग असतो. पण, तुम्ही जर सलग एक महिना दूध आणि साखरेविना, म्हणजेच 'ब्लॅक कॉफी' पिण्याचा नियम



केला तर काय होईल? आरोग्य तज्ज्ञांच्या मते, हा छोटासा बदल तुमच्या शरीरात आश्चर्यकारक फायदे घडवू शकतो. मात्र, त्याचे सेवन करण्यापूर्वी काही गोष्टींची माहिती असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**ऊर्जेचा तात्काळ स्रोत:** ब्लॅक कॉफीमधील कॅफिन थेट मज्जासंस्थेवर परिणाम करते, ज्यामुळे आळस दूर होऊन दिवसभर ताजेतवाने आणि उत्साही वाटते. सकाळी एक कप ब्लॅक कॉफी प्यायल्यास कामावर लक्ष केंद्रित करण्यासही मदत होते.

**वजन नियंत्रणासाठी प्रभावी**: ब्लॅक कॉफी शरीराची चयापचय क्रिया (चश-ींरलेश्रळीा) गतिमान करते. यामुळे अतिरिक्त कॅलरीज बर्न होण्यास मदत मिळते. पोटाच्या आरोग्यासाठीही ती फायदेशीर ठरते, ज्यामुळे वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.

मधुमेहाचा धोका कमी: विविध संशोधनांनुसार, नियमितपणे मर्यादित प्रमाणात ब्लॅक कॉफी पिणाऱ्यांमध्ये टाईप-२ मधुमेहाचा धोका कमी झाल्याचे दिसून आले आहे. हे स्वादुपिंडातील बीटा पेशींचे कार्य सुधारते, जे इन्सुलिनच्या निर्मितीसाठी आवश्यक असतात.

**मेंदूसाठीही फायदेशीर:** ब्लॅक कॉफीमुळे मेंदूला चालना मिळते. अल्झायमर आणि डिमेन्शियासारख्या विस्मरणाच्या आजारांचा धोका कमी करण्यास ती मदत करते. यामुळे एकाग्रता वाढते आणि मानसिक थकवा दूर होतो.

चमकदार त्वचेसाठी: कॉफी एक उत्तम अँटीऑक्सिडंट आहे. ते शरीरातील विषारी घटक बाहेर काढून त्वचा आतून स्वच्छ करते. यामुळे मुरुमे, पिंपल्स कमी होतात, सीबम निर्मिती नियंत्रणात राहते आणि चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते.

मात्र, ब्लॅक कॉफी प्रत्येकासाठी फायदेशीर ठरेलच असे नाही, ज्या व्यक्तींना ॲसिडिटी, पित्ताचा त्रास किंवा पचनाच्या गंभीर समस्या आहेत, त्यांनी रिकाम्या पोटी ब्लॅक कॉफी पिणे टाळावे.

# बेपत्ता तरुणाचा खंडाळा जंगलामध्ये आढळला मृतदेह; घातपाताचा संशय

**विदर्भ प्रजासत्ताक, पुसद दि.९.** - वाशीम मार्गावर असलेल्या खंडाळा घाटातील येलदरी नजिकच्या जंगलात बकऱ्या गाई चरण्यासाठी घेऊन गेलेल्या तरुण तीन दिवसांपासून बेपत्ता होता. त्या बेपत्ता तरुणाचा आता मृतदेह आढळला आहे. ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये घडलेल्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. बेपत्ता झालेल्या तरुणाचे डोके दगडाच्या व झाडाच्या फांदी खाली आढळून आल्याने खून झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून मंगळवारी दि. ८ जुलैला दुपारी समोर आली आहे. शेख अय्याज शेख हारून (वय २५) वर्ष रा. अमृत नगर असे मृतदेह आढळलेल्या तरुणाचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शेख अय्याज हा नेहमीप्रमाणे दि. ६ जुलै रोजी सकाळी त्याच्या मालकीच्या बकऱ्या व गाई खंडाळाच्या जंगलात चरण्यासाठी घेऊन गेला होता. चरण्यासाठी गेलेल्या बकऱ्या व गाई त्याच दिवशीच्या संध्याकाळी घरी परत आल्या होत्या. परंतु तो घरी आला नाही. त्यानंतर कुटूंबीयांनी त्यांचा जंगलामध्ये शोध घेतला असता, तो कुठेही आढळून आला नाही. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी ग्रामीण पोलिसांना बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर त्याचा शोध घेणे सुरू केले असता दि. ८ जुलै रोजी दुपारी जंगलात त्याने नेलेली कुऱ्हाड मृतदेहाच्या काही अंतरावर सापडली.

# गणितोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज सादर करण्यास ३१ जुलै पर्यंत वाढ

विदर्भ प्रजासत्ताक

**दि. ९अमरावती** -महाराष्ट्रातील माहिती तंत्रज्ञान विभाग विकसित करण्यात आला आहे महाडीबीटी पोर्टलवर हींींि:// ारहरवलीं.ारहरीरीहींीर.सीं.ळप संकेतस्थळावर सामाजिक न्याय व विशेष सेवा विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील केंद्रासाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्राच्या विविध मॅट्रिकोत्तर शिष्रिहिती योजना राबता येत असून, याचा लाभ घ्यावा असे आवाहन समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त मायादार यांनी केले आहे. समावेश वाढविण्यात आला आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वर्षाचे (ताजे) व नूतनीकरणाचे (नूतनीकरण) वैधानिक अर्ज भरण्याकरिता महाडीबीटी प्रथम राज्य शासन दि. ३० जून, २०२५ पासून कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे प्रथम वर्षाचे (ताजे) व नूतन (नूतनीकरण) अर्ज भरण्याची सुविधा पुन्हा उपलब्ध करून दिली. ३१ जुलै, २०२५ पर्यंत सक्तीने उपलब्ध करून दिली आहे. सन २०२३-२४ वर्षातील विद्यार्थी स्तरावर पूर्ततेसाठी पाठीमागे उमेदवारी अर्जाची वैधता पूर्तता करून पुन्हा अर्ज करण्याची सुविधा दि.३१ जुलै, २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आली.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तसेच राज्य शासनाची शिक्षण (फ्रीशीप शुल्क परीक्षा) (फ्रीअंतर्ग प्रतिवर्षी अर्जित संख्या लक्षात ठेवा भारत सरकार मॅट्रिक उत्तरोत्तर शिष्यवृत्ती (अनुसूचित जाती प्रवर्ग) मल्टि केंद्र निर्गमित सुधारित निर्देशक सुचनां होणा-या अर्जावर तात्काळ प्रक्रिया करून सदरहू अर्ज विहित न्यायाधिकरण निकाली काढण्याची सुचना शासनाचे सामाजिक व अधिकारी मंत्रालयाने राज्य नोंदणी केली आहेत.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती तसेच राज्य शासन शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीसाठी सामाजिक न्याय व विशेष अनुदान विभाग, शासन निर्णय दि. ७ जुलै २०२३ अन्वये अर्ज नोंदणी करणे हा देखील प्रवेशाचा भाग आहे. शैक्षणिक शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षात प्रवेशाचे निश्चितपणे स्पष्टीकरण या अहवालाच्या महाडीबीटीवर विविध मॅट्रिक उत्तर शिष्यवृत्ती योजना अर्जकृत नोंदवहीला विहित लाभाची अदाय समाज कल्याण विभागामार्फत करता येईल.

महाडीबीटी सनवारी सुचनांनुसार २०२५-२६ या शैक्षणिक संस्था, अपडेटेड करण्यासाठी महाडीबीटी वर्षभरटी प्रोफाइल दि.२३ जुलै, २०२५ पासून कार्यन्वित होणार आहेत.खाली शब्दाने त्यांचे इन्स्टिटट्यूट प्रोफाइल अपडेट करणे आवश्यक आहे आणि त्यात पुढील बाबींचा समावेश आहे. १) संस्था तपशील २) अभ्यासक्रम तपशील ३) फी तपशील ४) परीक्षेचा तपशील ५) कागदपत्रांचा तपशील.

राज्य शासनाच्या महाबीटीवर https://mahadbt.mah arashtra.gov.in या संकेत स्थळांवर योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली असून संबंधित विद्यार्थ्यांनी व संबंधित शाळांना अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचे अर्ज भरून शोधून काढलेले संवाद समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त श्रीमती माया केदार, यांनी केले आहे.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

बुधवार दि. ९ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# माजी आमदाराच्या असंवैधानिक वर्तनाचा विधिमंडळात निषेध

## आमदार प्रताप अडसड यांचा सरकारला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९धामणगाव रेल्वे**

अमरावती जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांशी असंवैधानिक भाषेत गैरवर्तन करणाऱ्या आमदाराचा काँग्रेसच्या माजी मुद्दा सोमवारी महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनात गाजला. विधीमंडळात आमदार प्रतापदादा अडसड यांनी हा विषय जोरदारपणे मांडत संबंधित माजी लोकप्रतिनिधीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी सरकारकडे केली. २ जुलै रोजी अमरावती

जिल्ह्यातील तहसील कार्यालयात झालेल्या या घटनेत, मागील काही प्रकरणांवर चर्चा सुरू असताना, संबंधित माजी आमदारांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि महिला नायब तहसीलदार यांच्याशी अत्यंत खालच्या स्तरावर, असंवैधानिक आणि अश्लील भाषेत अपमानकारक शब्द वापरले.यावेळी त्यांनी काही अधिकाऱ्यांना धमकीही दिली. महिला अधिकाऱ्यांबाबत वापरण्यात आलेली भाषा विशेषतः संतापजनक आणि लज्जास्पद असल्याचे सांगण्यात येते. या प्रकरणावर विधानसभेत प्रतिक्रिया देताना आमदार प्रताप अडसड म्हणाले,अधिकारी जर कायद्याचे पालन करत आपले कर्तव्य पार पाडत असतील, तर त्यांच्यावर दबाव आणणं, शिवीगाळ करणं आणि धमकावणं ही लोकशाहीविरोधी आणि निंदनीय कृती आहे.प्रशासनाचा मान राखणे हे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. अधिकारी चांगले काम करत असताना त्यांना असुरक्षिततेची भावना येणे अत्यंत दुर्दैवी आहे. तहसीलदारांनी यावेळी संयम राखत संबंधितांना शांततेने समजवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याकडून वादग्रस्त भाषेचा वापर सुरूच राहिला, अशी माहिती या प्रकरणातील सूत्रांनी दिली.



### सरकारकडे ठाम मागणी

या संपूर्ण प्रकाराची तात्काळ चौकशी करून संबंधित माजी आमदारावर कडक कारवाई करावी, अशी स्पष्ट मागणी आमदार अडसड यांनी सभागृहात केली. अधिकाऱ्यांच्या पाठीशी सरकारने उभे राहिले पाहिजे, अन्यथा प्रशासनाचे मनोबल खचेल, असा इशाराही त्यांनी दिला. हा विषय आता संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय बनला असून, संबंधित घटनेवर सरकार काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात अपघातप्रवण शंभर स्थळे निश्चित

## रस्ते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात :- जिल्हाधिकारी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती** – जिल्ह्यात पोलिसांनी १०० अपघाताची स्थळे निश्चित केली आहेत. या ठिकाणांची यंत्रणांनी संयुक्त पाहणी करावी. तसेच याठिकाणी अपघात होऊ नये, यासाठी कायमस्वरूप उपाययोजना करावीत, यासाठी आवश्यक असणारा निधी देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ते सुरक्षा विषयक बैठक घेण्यात आली. यावेळी अधिक्षक अभियंता रूपा गिरासे, प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, कार्यकारी अभियंता गिरी आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्ग यांच्यासह दुर्गम मेळघाटातील अरूंद रस्त्यांवरील अपघात रोखणे आव्हान आहे. त्याचबरोबर जिल्हा आणि तालुका मुख्यालयातील अपघाताचे प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. यासाठी प्रादेशिक परिवहन, पोलिस आणि बांधकाम विभागाने एकत्रितरित्या उपाययोजना सुचविणे आणि त्याकर कार्य करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या गतीमुळे होणाऱ्या अपघातांवर उपाययोजना होणे आवश्यक आहे. यासाठी स्पीडगनचा सक्षमपणे उपयोग व्हावा. पावसाळ्यात रस्त्यांच्या दुतर्फा येणाऱ्या झाडांच्या फांद्या कापून रस्त्यांवरील दृष्यमानता खुली करावी. मेळघाटात अपघात झाल्यास याठिकाणी क्रेन आणि टोईंगवाहन येण्यास उशिर लागत असल्याने परतवाडा येथे क्रेन, टोईंग वाहनाची व्यवस्था करावी. तातडीने संपर्क आणि मदत पोहोचावी, यासाठी या सेवा पुरविणाऱ्या एजंसी पॅनेलवर घ्याव्यात. त्यांची सेवा ऑनकॉल घेण्यास मदत होईल. अपघात झाल्यानंतर याची माहिती आयआरडीए यंत्रणेवर अपलोडकरावी. यामुळे जिल्ह्यात होणाऱ्या अपघातांचे विश्लेषण करण्यास मदत होईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# महाऑनलाईन संकेतस्थळ बंद : विद्यार्थ्यांना फटका

## कागदपत्रच अपलोड होईना अन् दाखले मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती** –

नियमितपणे महाऑनलाइन पोर्टलचा वापर विविध शासकीय सेवा व अर्ज प्रक्रियेसाठी करण्यात येतो. मात्र काही दिवसांपासून संकेतस्थळाची गती वारंवार संथ होत असल्याने केंद्र संचालकांना समस्यांचा समाना करावा लागत आहे. मंगळवारी (दि.८) महाऑनलाइन पोर्टल अचानक बंद पडले.विशेष म्हणजे सेवा केंद्राचे पोर्टल बंद पडल्याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसला. इंजिनीअरिंग, वैद्यकीय तसेच अकरावी प्रवेश प्रक्रियेकरिताचे दाखले विद्यार्थ्यांना न मिळाल्याने विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. आपले सरकार सेवा केंद्र हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाचा उपक्रम आहे. याच्या माध्यमातून लोकांना सरकारी सेवा व योजनांचा लाभ मिळतो. जिल्ह्यात १८८ आपले सरकार सेवा केंद्र आहेत. या केंद्राच्या माध्यमातून रेशनकार्ड, जातीचा दाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, निवासी दाखला, शासन योजनांचा लाभ, बिल भरणे या सोबतच परीक्षा फार्म व प्रम ाणपत्रांची कामे केली जातात. गत ८ दिवसांपासून संकेतस्थळ उघडण्यास खुप वेळ लागत आहे किंवा वारंवार सव्र्व्हर डाऊन होत असल्याने केंद्र संचालकांना त्रास सोसावा लागत आहे.लॉगिन केल्यानंतरही सेशन टाईम आउटचा मॅसेज येतो. अर्ज सबमिट करतांनासुध्दा सव्र्व्हर एरर किंवा प्लीज ट्राय अगेन लेटर असा त्रुटी संदेश येतो. परिणामतः कागदपत्रे अपलोड होत नाही. मंगळवारी आपले सरकार सेवा केंद्रांवर विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था बघायला मिळाली.

कागदपत्रे अपलोड न झाल्याने तर काहींना दाखले न मिळाल्याने प्रवेश मिळेल की नाही, याची चिंता विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून आली.

# तालुका कृषी कार्यालयाच्या शासकीय वाहनाचा वापर होतो अमरावतीत

## नांदगावचें वाहन उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या दिमतीला

### गेल्या सात वर्षांपासून वापर; टी.ए.ओ.आहेत बिना वाहनाविना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील तालुका कृषी विभागाच्या कारभारात गंभीर विसंगती उघडकीस आली आहे. उपविभागीय कृषी अधिकारी अमरावती, श्री. पंकज चेळे हे गेल्या सात वर्षांपासून बळजबरीने आपल्या पदाचा वापर करून नांदगाव खंडेश्वर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे चारचाकी वाहन स्वतःच वापरत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

नांदगाव खंडेश्वर हा अमरावती जिल्ह्यात क्षेत्रफळाने सर्वात मोठा तालुका असून तालुक्यात १६१ गावांमध्ये तालुका कृषी अधिकाऱ्यांना नियमितपणे भेटी देणे आवश्यक असते. मात्र त्यांना चारचाकी शासकीय वाहन उपलब्ध नसल्याने तालुकाकृषी अधिकारी यांना मोटारसायकलवरच दौरे करावे लागत आहेत. यामुळे त्यांची शारीरिक दमछाक होत असून, शासकीयकामकाजात अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना शासकीय वाहन नसल्याने वेळेवर दौऱ्याच्या ठिकाणी पोहोचणे शक्य होत नसल्याने शेतकऱ्यांच्या रोशास त्यांना सामोरे जावे लागत आहे.चारचाकी वाहनाचा वापर हा संबंधित तालुका कृषी कार्यालयाच्या सेवेसाठी असताना आणि राज्य शासनाने तालुका कृषी अधिकारी याना शासकीय वाहन उपलब्ध करून दिले असताना ते शासकिय वाहन उपविभागीय कृषी अधिकारी हे आपल्या पदाचा दुरुपयोग करून अमरावती कार्यालयाकरिता वापरत आहेत. त्यामुळे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील तालुका कृषीअधिकारी यांची कृषीविषयक कामे व शेतकऱ्यांशी संपर्क करताना त्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत.या प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देन्याची गरज आहे. नांदगाव खंडेश्वर येथील तालुका कृषी अधिकारी यांचे शासकीय वाहन पुन्हा तालुका कार्यालयाकडे परत मिळवून देण्यात यावे आणि दोषी अधिकाऱ्यावर अनुशासनात्मक कारवाई करण्यात यावी, तसेच येत्या आठ दिवसांत हे वाहन तालुका कार्यालयास उपलब्ध करून न दिल्यास तालुक्यातील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांकडून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.–




# अंजनगाव सुर्जीत गर्भपात केंद्राच्या संचालकाविरूध्द गुन्ह

## गर्भपात केंद्राची अर्थ व नोंदणी नेहमीकरीता रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अंजनगाव सुर्जी**

नियमबाह्य गर्भपात केंद्र चालविणे, अनियमितता राखणे, रेकॉर्डमध्ये सुसत्रता न ठेवल्याप्रकरणी येथील गर्भपात केंद्र सील करण्याची कारवाई जिल्हा नियंत्रण पथकाने केली. याप्रकरणी अंजनगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नालट यांनी सोमवारी (ता. ७) पोलीस ठाण्यात तक्रार केली. त्या आधारे गर्भपात केंद्राचे संचालक डॉ. युवराज पाटील यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

येथील संजीवनी हॉस्पिटलच्या एमपीटी केंद्राची तपासणी केल्यानंतर गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्ण निदान तंत्र (पीसीपीएनडिटी) कायदा १९९४ अंतर्गत अंजनगाव येथील संजीवनी हॉस्पिटलचे एमपीटी केंद्र तसेच बॉम्बे नर्सिंग होम अंतर्गत तपासणी करण्यात आली. यात पथकाला एमपीटीचा कुठलाही रेकॉर्ड तिथे आढळून आला नाही. एमपीसीपीचे नोंदणी अथवा अग्निमशन प्रमाणपत्र आढळून आले नाही.

यासह अनेक त्रुटी आढळून आल्याने या गर्भपात केंद्राची अर्थ व नोंदणी नेहमीकरीता रद्द करून ते सील करण्यात आले. जनतेच्या जीवाशी खेळून त्यांची व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नालट यांच्या तक्रारीवरून विविध कलमान्वये गर्भपात केद्राचे संचालक डॉ. युवराज पाटील यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहे.



# फिनले मिलचा प्रश्न दिल्ली दरबारी....

## आ. प्रवीण तायडेसह शिष्टमंडळाने मांडल्या कामगारांच्या व्यथा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अचलपूर** –

अचलपूर शहराच्या औद्योगिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिल्या गेलेल्याफिनले मिलला गत काही वर्षांपासून अंधाराच्या खाईत लोटले गेले आहे. एकेकाळी हजारो कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारी ही मिल आज शेकडो कामगारांच्या पोटापाण्याचा प्रश्न बनला आहे. मागील चार ते पाच वर्षांपासून बंद असलेल्या फिनले मिलमुळे सुमारे ८०० ते ९०० रोजंदारी कामगार आर्थिक अडचणीत सापडले असून, ३१ महिन्यांचा थकीत पगारमिळालेला नाही. परिणामी, या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर परिस्थितीचा स्थायी तोडगा काढण्यासाठी अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांनी पुढाकार घेतला. ७ जुलै रोजी अचलपूरच्या शिष्टमंडळाने थेट दिल्ली गाठली आणि केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांच्याशी उद्योग मंत्रालयात महत्वपूर्ण चर्चा केली.या चर्चेत दिल्लीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी देखील याबाबत गांभीयनि नोंद घेत सकारात्मक आश्वासन दिले. ही बैठक म्हणजे केवळ औपचारिकता नव्हे, तर अचलपूरच्या कामगारांच्या न्यायासाठीचा निर्णायक टप्पा होता. या शिष्टमंडळातील आमदार प्रवीण भाऊ तायडे यांचे कार्य केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता, त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन मंत्रालयात ठोस भूमिका मांडली. या संघर्षशील नेतृत्वामुळेच आज अचलपूरमध्ये नव्या आशेचा किरण दिसत आहे. फिनले मिल पुन्हा सुरू होण्यासाठी फक्त सरकार किंवा प्रतिनिधींचे प्रयत्न पुरेसे नाहीत. अचलपूरच्या प्रत्येक नागरिकाचा पाठिंबा हिच खरी ताकद ठरेल. हे आंदोलन केवळ पगारासाठी नव्हे, तर पुन्हा उभ्या राहणाऱ्या जुडवा नगरीसाठी वरदान आहे.



# पिण्याच्या पाण्याची सोय मात्र रस्त्याची लागली वाट

## रावळगाव ग्रामस्थांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विरोधात आक्रोश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९आसेगाव पूर्णा**–

अचलपूर तालुक्यातील ग्रामपंचायत दोनोडा वार्ड नं. तीन रावळगाव मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने जल वाहिनीचे काम आठ महिन्यापूर्वी केले. यावेळी त्यांनी गावातील चांगले गुढगुढीत रस्ते फोडून जलवाहिनी टाकली. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सोय झाली. मात्र रस्त्याची वाट लागल्याने महाराष्ट्र जल प्राधिकरना विरुद्ध ग्रामस्थांमध्ये आक्रोश आहे.विकासापासून दूर असलेल्या रावळगाव येथे मोठा गाजावाजा करत जलवाहिनीचे काम करण्यात आले. गावात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने जलवाहिनी टाकण्याचे काम आठ महिन्यापूर्वी केले. जलवाहिनी टाकताना गावातील गुळगुळीत रस्ते खोदले. मात्र पाईप लाईनची नाली बुजविताना थातूरमातूर पद्धतीनेच बुजविले. त्यामुळे गावातील रस्त्याची चाळण झाली. सध्या पावसाचे दिवस असल्याने त्या खड्यात पावसाचे पाणी साचते. त्यामुळे खड्ड्याच्या खोलीचा अंदाज लागत नाही. त्या खड्यांमुळे किरकोळ अपघाताची गावात मालिका सुरूच आहे. सर्वत्र रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले आहे या संदर्भात प्राधिकरणाला निवेदन सुद्धा दिले. मात्र प्राधिकरण विभागाला मोठ्या अपघाताची प्रतीक्षा आहे की काय ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांमधून येत आहे.जीवन प्राधिकरण विभागाने पाईपलाईन टाकल्यामुळे पिण्याच्या पाण्याची सोय झाली असली तरी रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. जल प्रधिकरणाने जसे रस्ते उखडलेले तसेच करून देण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केली.सदर कामा संदर्भात गावातील ग्रामस्थांच्या तक्रारी येत असल्याचे सदर कात्रटदार यांना सांगितले असून काम लवकर करण्याचे सांगितले. अशी माहिती मनीष धर्माळे ग्रामविकास अधिकारी दोनोळा, रावळगाव यांनी दिली.आपण या संदर्भात तहसील व प्राधिकरणाकडे तक्रारी दिल्या असून सबंधितांनी या तक्रारीची दखल घेतलेली नाही. अशी प्रतिक्रिया सुरेंद्र चौखंडे सरपंच, दोनोळा, रावळगाव गट ग्रामपंचायत यांनी दिली.

### दूषित पाणी पुरवठा; आरोग्य धोक्यात

नवीन टाकलेली पाईपलाईन थातूरमातूर पद्धतीने दाबल्यामुळे ती व्यवस्थित न बुजविल्यामुळे त्या नालीवरून कोणतेही वाहन गेले तर ती पाईपलाईन लिकेज होते. त्यामुळे दूषित पाण्याचा पुरवठा होऊन गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



# महानगरपालिकेत 'ई-ऑफीस प्रणाली' कार्यशाळा

## डिजिटल युगात वेळेची बचत अत्यंत आवश्यक : सौम्या शर्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती-** शासकीय कामकाजात डिजिटल प्रणालीचा प्रभावी वापर करून पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेत 'ई-ऑफीस प्रणाली विषयक कार्यशाळा घेण्यात आली.

महानगरपालिकेतील विविध विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. ई-ऑफीस प्रणाली अंतर्गत फाईल ट्रॅकिंग, ई-नोटिंग, दस्तऐवज व्यवस्थापन व डिजिटल स्वाक्षरी यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रफुल मेहर, आशिष विधळे यांनी उपस्थितांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाच्यामाध्यमातून प्रणालीचा वापर कसा करावा याचे प्रशिक्षण दिले व यामधील तांत्रिक बाबी समजावून सांगितल्या.



महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, ई-ऑफीस प्रणालीच्या माध्यमातून कार्यालयीन प्रक्रियाप्र जलद. पारदर्शक आणि कार्यक्षम होणार असून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देणे शक्य होईल. आजच्या डिजिटल युगात शासकीय आणि निमशासकीय कामकाजात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि वेळेची बचत अत्यंत आवश्यक झाली आहे. फायलींच्या हालचाली अधिक वेगवान आणि ट्रॅक करण्यायोग्य बनतील, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता येईल, तसेच, नागरिकांना वेळेत सेवा देणे शक्य होईल, असे त्या म्हणाल्यात.उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी सांगितले की, कोणतीही नवीन प्रणाली स्वीकारतांना सुरुवातीस थोडी अडचण होऊ शकते, पण सातत्यपूर्ण सराव आणि समर्पित प्रयत्नांनी आपण ती आत्मसात करू शकतो. आपला सहभाग आणि सहकार्य यावरच या उपक्रमाचे यश अवलंबून आहे. आपण ही प्रणाली केवळ एक बदल म्हणून नव्हे, तर आपल्या कामकाजात एक नवा मानक निर्माण करणारा टप्पा म्हणून स्वीकारा, असे आवाहन त्यांनी केले.संचालन सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे यांनी कैले. या कार्यशाळेत अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या यशस्वीतेकरीता सॉफ्टवेअर अभियंता रोहन कुरील, प्रकल्प अभियंता पंकज मानवटकर, हार्डवेअर अभियंता चेतन रामटेके, संगणक विभागातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# दर्यापूर तालुक्यात आरटीई अर्तंगत १५८ पैकी १५६ जणांचे प्रवेश निश्चित , दोन जागा रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९येवदा :** दर्यापूर तालुक्यात २०२५- २६ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत २५ टक्के जागा दुर्बल आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गातील मुलांसाठी राखीव असतात. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी, १४ जानेवारी २०२५ पासून ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

आरटीई कोट्यातून होत असलेल्या प्रवेश प्रक्रियेच्या पाचव्या प्रतीक्षा फेरीनंतर दर्यापूर तालुक्यातील १५८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. कागदपत्रांची पूर्तता नझाल्याने आरटीईच्या ०२ जागा रिक्त आहेत. यंदा आरटीई प्रवेशाच्या ५ प्रवेश फेऱ्या झाल्या. पहिल्या फेरीत १५८ जणांची निवड यादी लागली होती. ९ जूनपर्यंत पालकांना प्रवेश निश्चित करावे लागणार होते. आरटीई कायद्यांतर्गत गरीब गरजू मुलांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकीत शाळांमध्ये शिक्षण घेता यावे. यासाठी पहिल्या वर्गातील प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के प्रवेश आरटीईच्या कोट्यातून देण्यात येतात. २०२५-२६ मध्ये तालुक्यात आरटीई प्रक्रियेला गती




मिळाली आणि १६ जूनपर्यंत १५८ प्रवेशापैकी १५६ विद्याथ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले. पण काहींनी वेळेत प्रवेश घेतला नसल्याने जागा रिक्त राहिल्या आहेत.आरटीई प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन राबवण्यात आली होती. आरटीई अंतर्गत तालुक्यातील १५८ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. यासाठी पालकांना वेळोवेळी आवाहन केले होते. पंचायत समिती स्तरावर कागदपत्र छाननीनंतर प्रवेशाच्या पत्रानंतर तालुक्यातील १५६ विद्याथ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. अशी माहिती सतोष घुगे, प्रभारी. गट शिक्षणाधिकारी पं.स. दर्यापूर यांनी दिली

# चांदूर रेल्वेत तेली समाज बांधवांची बैठक

## १९ जुलैच्या कार्यक्रमासंदर्भात केली चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९चांदूर रेल्वे-** यश असोसिएट्स, आसरा हॉटेल व सावली बचत गटातर्फे येत्या १९ जुलै ला राज्यस्तरीय तेली समाज गुणवंत विद्यार्थी सत्कार व उद्योजक मेळावा अमरावती येथील सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी ६ जुलै चांदूर रेल्वे येथे एक बैठक धनश्री श्रीराव यांच्या घरी पार पडली. या बैठकीमध्ये विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा



अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. या बैठकीसाठी कैलास गिरोळकर, जयंतराव औतकर, नितीन जावरे, आशुतोष गुल्हाने, दिलीप गुल्हाने, केशव वंजारी, निलेश गुल्हाने, रमेशराव गुल्हाने, अशोकराव हांडे, महेश गुल्हाने, बंडू आंबटकर, प्रशांत कोठेकर, राजेश डिवरे, अतुल शिरभाते, रमेश गिरोळकर, नरेंद्र ढोबळे, योगेश डोनेकर, सचिन बिजवे, बच्चू वानरे, दीपक गिरोळकर, मनीष खुणे, धनश्री श्रीराव, छाया गिरोळकर, योगिता कळंबे, लीना जावरे, स्वाती निस्ताने, धनश्री जीरापुरे व इतर उपस्थित होते.


### झेनिथ हॉस्पिटलमध्ये डॉ. संग्राम देशमुख यांच्या १०० संधि प्रत्यारोपणांच्या यशस्वी कामगिरी निमित्त आयोजित

# मोफत संधिवात तपासणी शिबिर ठरले अत्यंत यशस्वी व दर्जेदार

# हेल्थ कॅम्पसाठी झेनिथने पुन्हा एकदा सिद्ध केली आपली ओळख

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती -** झेनिथ हॉस्पिटल, अमरावतीतर्फे १०० संधि प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या यशाच्या निमित्ताने आयोजित मोफत गुडघेदुखी व संधिवात तपासणी शिबिर अत्यंत यशस्वी झाले. रुग्णांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती आणि दिलेल्या उत्कृष्ट सुविधा यांमुळे झेनिथ हॉस्पिटल का दर्जेदार हेल्थ कॅम्पसाठी ओळखले जाते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. या शिबिरामध्ये मोफत इचऊ (हाडांची मजबुती तपासणी) करण्यात आली, जी ऑस्टिओपोरोसिसपासून बचावासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. तसेच, द-ठरू आणि पॅथॉलॉजी तपासण्यांवर ५०% सवलतीमुळे मोठ्या संख्येने रुग्णांना फायदा झाला.या शिबिराचे नेतृत्व झेनिथ हॉस्पिटलचे प्रतिभावान संधि प्रत्यारोपण तज्ज्ञडॉ. संग्राम देशमुख (चइइड, चड जींहे) यांनी केले. इंग्लंडहून जॉइंट रिप्लेसमेंटमध्ये फेलोशिप प्राप्त डॉ. देशमुख यांनी अत्यंत बारकाईने आणि अनुभवपूर्ण पद्धतीने रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य मार्गदर्शन दिले.या शिबिरात सांधेदुखी, गुडघ्यांचे ऑस्टिओआर्थरायटिस, चालताना त्रास होणे, संधिवात, स्पॉन्डिलायटिस, हिप



आर्थरायटिस अशा विविध तक्रारींवर उपाय शोधणाऱ्या रुग्णांना विशेष लाभ झाला.या यशस्वी आयोजनात फार्मा इंडस्ट्रीतील अनेक महत्त्वाच्या मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हसचे विशेष सहकार्य लाभले. त्यामध्ये विशेषतः अश्विन मुथा, रोहित राऊत, प्रमोद मुंदडा, अनिल पंजवानी, शोएब खान, हमीद खान यांचा उल्लेखनीय सहभाग होता.या सर्वांचा सहभाग अत्यंत कौतुकास्पद असून, त्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.विशेष आभार झेनिथ हॉस्पिटलच्या संपूर्ण टीम व स्टाफचे, ज्यांनी संपूर्ण आयोजन अत्यंत व्यवस्थित, वेळेवर आणि मानवतावादी दृष्टिकोनातून पार पाडले. रुग्णांची मदत, रिपोर्टिंग आणि मार्गदर्शन अशा प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या सेवा वृत्तीचा आणि समर्पणाचा प्रत्यय आला.आगामी काळातही झेनिथ हॉस्पिटल समाजाच्या सेवेसाठी अशाच दर्जेदार आणि उपयुक्त वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करत राहील.

# रोटरी क्लब ऑफ अमरावती मिडटाऊनने केले मोफत आरोग्य आणि रक्त तपासणी शिबिराचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** रोटरी क्लब ऑफ अमरावती मिडटाऊन माधवबाग साईनगर अमरावती व युवा स्वाभिमान पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीच्या शुभ मुहूर्तावर जिजाऊ भवन, साईनगर, अमरावती येथे मोफत आरोग्य तपासणी व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या लोककल्याणकारी उपक्रमात, डॉक्टरांच्या पथकाने तज्ञ सर्वसामान्यांना आरोग्य सल्ला आणि चाचणी सेवा प्रदान केल्या. शिबिरात खालील वैद्यकीय तज्ञांनी आपली सेवा दिली:डॉ. कल्पना अग्रवाल जनरल फिजिशियन डॉ. पार्वती मोरे माधवबाग साईनगर डॉ. मंजुषा देशमुख त्वचारोगतज्ज्ञ डॉ.मनमोहन सोनी दंतवैद्य महा पॅथॉलॉजी लॅब द्वारे मोफत रक्त तपासणी सुविधा. शिबिराच्या यशस्वी आयोजनात अमरावती येथील हरिना फाउंडेशनने महत्त्वपूर्ण योगदान दिले.नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी, आमचे प्रमुख पाहुणे श्री. चंद्रकांतजी पोपट आणि प्रा. मार्गदर्शन सत्र मुकेशजी लोहिया यांनी आयोजित केले. शिबिरात उपस्थित नागरिकांना मोफत औषधेही वाटप करण्यात आली. एकूण ११२ हून अधिक लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला.इतर माननीय रोटरी सदस्य रोटेरियन आशिष मोंगा अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अमरावती मिडटाऊन रोटेरियन मनमोहन सोनी - सचिव, रोटरी क्लब ऑफ अमरावती मिडटाऊन रोटेरियन नीता कक्कर रोटेरियन मनीषा चांडक रोटेरियन तत्वज्ञान भूत रोटेरियन सचिन अगीवाल रोटेरियन कुंजन वेदा रोटेरियन आनंद मालपाणी रोटेरियन प्रसाद मोरे विशेष




आभार:सचिन भेंडे यांचे त्यांच्या अमूल्य सहकार्याबद्दल आभार.या लोककल्याणकारी उपक्रमात, डॉक्टरांच्या पथकाने तज्ञ सर्वसामान्यांना आरोग्य सल्ला आणि चाचणी सेवा प्रदान केल्या. रोटरी क्लब ऑफ अमरावती मिडटाऊनचा हा उपक्रम युनाइट फॉर गुड या त्यांच्या भावनेचे प्रतिबिंबित करतो, जो आरोग्यसेवा आणि सामाजिक सहकार्याद्वारे समुदायात सकारात्मक आणि चिरस्थायी बदल घडवून आणण्यासाठी समर्पित आहे.

# अमरावती येथून चोरी गेलेला ऑटो मोर्शी पोलिसांनी पकडला !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मोर्शी -** फ्रेजरपुरा अमरावती पोलीस स्टेशन अंतर्गत चोरी गेलेला ऑटो मोर्शी पोलिसांनी जप्त केला. पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असतांना गोपनीय माहिती मिळाली की मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर एक विनानंबरचा ऑटो संशयास्पदरित्या उभा आहे.यावरून स्कॉड विभागाचे पोलीस उपनिरीक्षक चव्हाण, पो.कॉ. स्वप्निल तुषारबायस्कर, छत्रपती करपते यांनी घटनास्थळी जाऊन सदर ऑटो पोलीस स्टेशन मोर्शी येथे आणून ऑटोचा चेचीस व इंजिन नंबर याची बारकाईने शहानिशा केली असता सदर ऑटो हा



पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अमरावती येथून चोरी गेलेला असल्याचे निष्पन्न झाले. अमरावती येथील प्रशंजीत भाऊराव सरदार यांच्या मालकीचा ऑटो काही दिवसापूर्वी चोरी झाल्याचा रिपोर्ट त्यांनी फ्रेझरपुरा पोलीस स्टेशन येथे दिला होता. सदर ऑटो हा शहर हद्दीतून चोरी गेला असल्याने पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा यांचे ताब्यात देण्यातआला. सदरची कारवाई मोर्शीचे ठाणेदार सुरज बोंडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीसउपनिरीक्षक तुषार चव्हाण, हे. कॉ स्वप्निल बायस्कर,छत्रपती करपते यांनी केली आहे. मोर्शी शहरात बिना नंबर प्लेटचे दुचाकी वाहन फिरत असल्याने मोर्शी येथील तत्कालीन ठाणेदार नितीन देशमुख यांनी मोर्शी शहरातील गजबजल्या छत्रपती शिवाजी चौक, सिंभोरा रोड मोर्शी व जयस्तंभ चौकात नाकाबंदी करून विनानंबरच्या दुचाकीवरसुध्दा कारवाई केली.-

# येरड येथील बेंबळा नदीच्या पुलावरील रस्ता बनला चिखलमय : पुलावर घाणीचे साम्राज्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९चांदूर रेल्वे** चांदूर रेल्वे तालुक्यातील येरड येथील बेंबळा नदीवरील पुलाची अवस्था दिवसेंदिवस भयावह होत चालली आहे. पावसाळा सुरू होताच या पुलावर चिखल, साचलेले पाणी आणि खोल खड्डे व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. हा रस्ता म्हणजे जणू काही चिखलांचा देखावा वाटतो! वाहनचालकांना तारेवरची कसरत करत या रस्त्यावरून प्रवास करावा लागतो.येरड, खरबी मांडवगड व परिसरातील शेतकरी, शेतमजूर, महिला आणि रोजंदारीवर जाणारे कामगार यांची या रस्त्यामुळे अक्षरशः ससेहोलपट सुरू झाली आहे. पुलावरून पायदळ जाणे देखील घोक्याचे बनले आहे. अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.येरड,



खरबी येथील शेतकऱ्यांची शेतजमीन ही मौजे येरड, धामक, दाभा, कुऱ्हेगाव शेतशिवारात असून येरड जवळील बेंबळा नदी पुलावरून शेतजमिनीकडे जाणारा हा रस्ता मुख्य एकमेव मार्ग आहे. नदीच्या पुलावरीला रस्ता सध्या अत्यंत जर्जर अवस्थेत आहे. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता पूर्णपणे चिखलमय व रस्त्यावर घाणीचे साम्राज्य असल्याने नागरीकांचेआरोग्य धोक्यात आले आहे. बेंबळा नदीवरील पुल बांधून जवळपास पंधरा वर्षे झाली असून त्यानंतर या पुलावरील रस्त्याची संबधीत विभागाने एकदाही दुरुस्ती केली नाही. या पुलावरील रस्त्याकडे संबंधीत विभाग व लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष द्यावे. अन्यथा आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# नागपूर, वर्धा जिल्ह्यातील शाळांना मुसळधार पावसामुळे आज सुट्टी

## संभाजीनगर, बीड, जालना, हिंगोली जिल्ह्यांत विजांसह सरींची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९वर्धा**

भारतीय हवामान विभागाने वर्धा जिल्ह्यास रेड अलर्ट दिला आहे. जिल्ह्यात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच मागील दोन दिवसापासून देखील अनेक भागात मुसळधार पाऊस झालेला आहे. त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी आज जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये तसेच कोचिंग सेंटर्सना सुट्टी जाहीर केली आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार अति मुसळधार पाऊस झाल्यास जिल्ह्यात अनेक भागात अचानक पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील रस्ते मार्ग हे पुराच्या पाण्याने प्रभावित झाले असून कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये, याकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी सुट्टी जाहीर केली आहे.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व शासन परिपत्रकानुसार प्राप्त अधिकारान्वये जिल्ह्यातील सर्व सरकारी व खासगी अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये तसेच कोचिंग सेंटर्स यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण जिल्हा सीमा क्षेत्रामध्ये बुधवारी सदर सुट्टी जाहीर केली होती.

# दोन हजार गोर गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांचा वाढदिवसा निमित्त स्तुत्य उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव खंडेश्वर**

शैक्षणिक वर्षाला सुरवात होताच शालेय उपयोगी साहित्य विक्री करणाऱ्या दुकानांत पालकांची गर्दी पाहायला मिळते मात्र नांदगाव शहरातील गोर गरीब दोन हजार विद्यार्थ्यांना नोटबुक शालेय साहित्याचे वाटप ठाकरे गटाच्या शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी आपल्या वाढदिवसा निमित्ताने केले

मागील तेरा वर्षांपासून शहरातील ओंकारखेडा परिसरातील जिल्हा परिषद शाळेतील पारधी समाजाच्या विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय



साहित्य वाटपाचा उपक्रम प्रकाश मारोटकर आपल्या वाढदिवसा निमित्त सतत राबवित आहे यावर्षी सुद्धा वाढदिवस निमित्ताने शहरातील जिल्हा परिषद मुलांची शाळा येथील ९९ विद्यार्थ्यांना जी प कन्या शाळा येथील १५७ विद्यार्थ्यांना जी प उर्दू शाळा येथील २३० रामराव भोयर विद्यालयातील ३०० विद्यार्थी जी प शाळा ओंकारखेडा येथील १३० विद्यार्थ्यांना डॉ जाकीर हुसेन उर्दू हायस्कूल येथील १२५ विद्यार्थ्यांना व शिवाजी महाविद्यालयातील १०५६ अशा एकूण दोन हजार विद्यार्थ्यांना नोटबुक वाटप केलेत या सामाजिक उपक्रमांनी प्रकाश मारोटकर यांनी वाढदिवस साजरा केला यावेळी निलेश इखार वासुदेव लोखंडे डॉ वीरेंद्र खापरी रवी ठाकूर सुनील गुरमुळे शुभम रावेकर अक्षय हिवराळे पवन शिरभाते अनिकेत गटुले प्रेम हिवराळे पवन पुसदकर सुमित लोमटे अमन मानकर चेतन डकरे बबलू सारवे गुणवंत चांदुरकर शेख मेहताब कार्तिक सोनोने इत्यादींनी परिश्रम घेतले.

### आई वडिलांचे नाव मोठे करण्याकरिता विद्यार्थ्यांनि प्रयत्न केले पाहिजे

आपले आई वडील प्रचंड मेहनत करून आपल्याला शिकवितात लहाण्याचं मोठं करतात आपल्या आई वडिलांचे नाव मोठं होईल एवढी शैक्षणिक प्रगती करावी असे मत प्रकाश मारोटकर यांनी व्यक्त केले.

# पेरलेले बियाणे निघाले नसल्याने युवा सेनेने कृषी कार्यालयावर धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९चांदुर बाजार**

चांदूर बाजार जिल्ह्यात व चांदुर बाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात बोगस बियाणे विकणाऱ्यांची टोळी सक्रिय असल्यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बोगस बियाणे विक्री केले जात आहे. बियाणे पेरणीनंतरही शेतीत निघाले नसल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली आहे. या बोगस बियाणे



विकणाऱ्या कृषीसेवा केंद्र, दुकानांची तपासणी करून अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे, या मागणीसाठी युवासेना तालुका प्रमुख रोशन जयसिंगपुरे यांनी कृषी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. आधीच कर्जबाजारीपणामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या पायाखालील जमीन सरकली आहे. अशा शेतकऱ्यांच्या शेतात जावून पंचनामे करावे. तसेच बोगस बियाणे विकणाऱ्या दुकान संचालक व तपासणी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी. कारवाई न झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने युवा सेना आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला.या वेळी तालुका प्रमुख रोशन जयसिंगपुरे, शिवसेना तालुका प्रमुख शैलेश पांडे, विक्रम फुकट, दादाराव तायडे, मनोज बारस्कर, शरद राठोड, रोशन राठोड, नईम शेख, चेतन जावरकर, रामकृष्ण राऊत, निलेश वाणरे, रणजित घाटोळ, पवन राऊत आदींसह शेतकरी उपस्थित होते.

# अमरावती विद्यापीठाच्या पदभरतीस मंजुरी

## ९९ शिक्षक, ७१ इतर कर्मचारी मिळणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासह राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरल्यास शासनाने अखेर मंजुरी दिली आहे. या मंजुरीमुळे अमरावती विद्यापीठाने यापूर्वी मागणी केलेल्या ९९ शिक्षक व ७१ इतर कर्मचाऱ्यांच्या भरतीचा मार्गही मोकळा झाला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (एनइपी) अंमलबजावणीनुसार उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची पुरेशी संख्या असणे गरजेचे आहे. अमरावती विद्यापीठात अधिकारी-कर्मचाऱ्यांची तब्बल २५० आणि शिक्षकांची सुमारे १३५ पदे रिक्त आहेत. यापैकी तातडीची मदत म्हणून शिक्षकांची ९९ आणि श्रेणी एक ते चार च्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची किमान ७१ पदे पुरवावी, अशी मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली होती. त्या निर्णयाला खुद्द




मुख्यमंत्री महोदयांनी मंजुरी दिली असून अभियांत्रिकीच्या अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीसही अनुकूलता दर्शविली आहे. ताज्या सूचनेनुसार अकृषी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध लवकरात लवकर पूर्ण करण्यात येणार आहे.

ही मंजुरी देण्यापूर्वी विधानभवनातील उच्च व तंत्र शिक्षण विभागात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी विद्यापीठांच्या प्रलंबित मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव सौरभ, नियोजनचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्र शिक्षण संचालक विनोद मोहितकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदी अधिकारी उपस्थित होते. विद्यापीठात मनुष्यबळाचा अभाव असल्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होत आहे. शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे संशोधनातही विद्यापीठ माघारले आहे. गेल्यावेळी 'नॅक'च्या समितीनेही या मुद्द्याकडे लक्ष वेधले होते.

# एकनाथ शिंदेंच्या आमदाराचा राग अनावर

## शिवसेनेच्या संजय गायकवाडांची कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण निकृष्ट जेवण दिल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड पुन्हा एकदा वादात सापडण्याची शक्यता आहे. आमदार निवासमधील कॅन्टीन कर्मचाऱ्याने निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्यामुळे त्यांनी थेट कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केली.

आमदारांना अशा पद्धतीने जेवण देत असेल तर सर्वसामान्य नागरिकांना कशा पद्धतीने जेवण मिळत असेल? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

प्रसारमाध्यमांशी बोलताना संजय गायकवाड यांनी सांगितले की, रात्री दहा वाजता माझी जेवणाची वेळ असते. त्यामुळे काल रात्री मी नऊ-साडेनऊ वाजता वरण भात आणि पोळी याची ऑर्डर दिली होती. त्यात भातासोबत वरण मिक्स करून मी पहिला घास घेताच मला खराब वाटला. मला वाटले वरणामध्ये चिंच असेल, म्हणून मी पोळी सोबत दुसरा घास घेतला असता मला वोमिटिंग झाली. त्यामुळे मी वरण चेक केले असता ते पूर्णपणे विटलेले होते.



कॅन्टीन कर्मचाऱ्यांनी यापूर्वी देखीलअनेक वेळा मला निकृष्ट दर्जाचे जेवण देण्याचा प्रयत्न केला होता. त्याचवेळी कॅन्टीन मालकाला समज दिली होती. महाराष्ट्रातील पाच ते दहा हजार लोक रोज या कॅन्टीन मध्ये जेवण करतात. या सर्वांच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप गायकवाड यांनी केला आहे.

सडलेले आणि कुजलेले जेवण महाराष्ट्रातून आलेल्या नागरिकांना देऊन त्यांच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप संजय गायकवाड यांनी केला आहे. जेवण अतिशय घाणेरडे असल्यामुळे माझा राग अनावर झाला. त्यामुळे माझा मूळ स्वभाव दिसून आला. अशा शब्दात संजय गायकवाड यांनी आपल्या कृतीचे समर्थन केले आहे.

आमदार निवासाच्या कॅन्टीनमध्ये निकृष्ट दर्जाचे जेवण योग्यच नाही. हा आमच्या जीवनाशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप संजय गायकवाड यांनी केला आहे. या संदर्भातली तक्रार आपण अन्न व औषध प्रशासन विभागाला देखील करणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. तसेच आज विधानसभेमध्ये देखील याविषयी आवाज उठवणार असल्याचे संजय गायकवाड यांनी म्हटले आहे.

# लॉयन्स क्लब अध्यक्षपदी जितेंद्र चौधरी तर सचिव मोहन राऊत खजिनदार विशाल खडसे यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९धामणगाव रेल्वे**

सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, क्रीडा, आरोग्य सह विविध क्षेत्रात नेहमी योगदान देणाऱ्या लॉयन्स क्लब (एलिट) च्या अध्यक्षपदीअध्यक्षपदी जितेंद्र चौधरी तर सचिव मोहन राऊत खजिनदार विशाल खडसे यांची निवड करण्यात आली हा शपथग्रहण सोहळा गोव्यात पार पडला.



लॉयन्स क्लब (एलिट) च्या वतीने दरवर्षी नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात येते गोव्याचे लॉयन्स क्लबचे प्रांतपाल वासुदेव वलवलकर यांच्या अध्यक्षतेखाली येथे हॉटेल कॅलक्स जोईया दो मार येथे शपथग्रहण सोहळा पार पडला यावेळी प्रमुख अतिथी सेवा सप्ताह प्रमुख लॉ विलास बुटले यांची उपस्थिती होती लॉयन्स क्लबचे कार्य हे केवळ महाराष्ट्रात नसून २१८ देशात आहे सदस्यांनी सामाजिक उपक्रमात अधिक सहभाग घेण्याचे आवाहन प्रांतपाल वासुदेव वलवलकर यांनी केले. यावेळी मावळते अध्यक्ष लॉ नरेंद्र गुल्हाने सचिव लॉ विनय शिरभाते खजिनदार लॉ चेतन कोठारी यांनी नवनियुक्त अध्यक्ष लॉ जितेंद्र चौधरी सचिव लॉ मोहन राऊत खजिनदार लॉ विशाल खडसे यांच्याकडे पदभार दिला. मागील एक वर्षात केलेल्या विविध कार्याचा आढावा माजी अध्यक्ष लॉ नरेंद्र गुल्हाने यांनी यावेळी मांडला लॉ विक्रम बुधलानी लॉ विजय देशमुख लॉ राजाभाऊ टेंभरे लॉ अंकित पोळ लॉ मंगेश सव्वालाखे लॉ सुमित बोराखडे लॉ प्रमोद कुचेरिया लॉ दिलीप दगडकर लॉ विशाल जयस्वाल लॉ विनोद तलवारे लॉ प्रशांत बन्नोरे लॉ देवेंद्र वानखडे लॉ अजय हरवानी लॉ सागर ठाकूर यांची उपस्थिती होती.

# न्यायालयातून आरोपी पसार; पोलिसांनी तत्काळ पकडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

सहा महिन्यांपूर्वी राजापेठ पोलिसांनी दरोड्याच्या प्रयत्नातील काही आरोपींना अटक केली होती. त्यापैकीच एका आरोपीला सोमवारी येथील न्यायालयात तारखेवर हजर करण्यासाठी पोलिसांनी आणले होते. यावेळी तैनात पोलिसांना चकमा देऊन आरोपी पळाला होता; मात्र पोलिसांना तो पळाल्याचे लक्षात येताच त्याला अवघ्या दहा मिनिटांत पकडले. हा प्रकार येथील न्यायालयाच्या परिसरात सोमवारी दुपारी घडला.

विजय संजय सूर्यवंशी (२३) विलासनगर अमरावती असे न्यायालयातून पसार झालेल्या आरोपीचे नाव आहे. विजय सूर्यवंशीला राजापेठ पोलिसांनी सहा महिन्यांपूर्वी दरोड्याच्या प्रयत्नात अटककेली होती. तेव्हापासून तो येथील कारागृहात आहे. दरम्यान सोमवारी त्याची न्यायालयात असल्यामुळे तारीख त्याला मुख्यालयातील पोलिसांनी कारागृहातून ताब्यात घेऊन न्यायालयात आणले होते. पोलिसांच्या बाजूला असलेला विजय सूर्यवंशी पोलिसांना चकमा देऊन पळाला. आरोपी पळाल्याचे पोलिसांना लक्षात येताच त्यांनी तत्काळ ही माहिती पोलिस नियंत्रण कक्षाला देत त्याचा शोध सुरू केला. त्यावेळी न्यायालय परिसरातच तो दहा ते पंधरा मिनिटांत पोलिसांना दिसला. त्यावेळी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले व न्यायालयात हजर केले. याप्रकरणी त्याच्याविरुध्द गाडेनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.

# 'आधार' शहरी बेघर निवारा केंद्रास आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची सदिच्छा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या 'आधार' शहरी बेघर निवारा केंद्राला महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी निवाऱ्यात वास्तव्यास असलेल्या वृद्ध, दिव्यांग आणि मनोरुग्ण बांधवांची सखोल चौकशी



केली. केंद्रातील स्वच्छता, सेवा-सुविधा आणि व्यवस्थापनाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निवाऱ्यात दैनंदिन आरोग्य तपासणी व डॉक्टरांची नियमित भेट सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. तसेच निवाऱ्यातील मोकळ्या जागेत परसबाग (किचन गार्डन) तयार करण्याबाबतही सूचना दिल्या.

'आधार' केंद्र हे सामाजिक देणगीदारांच्या सहकार्याने चालविले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी समाधान व्यक्त केले आणि भविष्यात आवश्यक त्या सर्व गोष्टींचा पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

या भेटीप्रसंगी उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भूषण पुसदकर, भूषण बाळे, प्रफुल ठाकरे, निवारा संचालक राजीव बसवनाथे, व्यवस्थापिका ज्योती राठोड, काळजीवाहक विलास थोरात, सदानंद ठाकरे आणि रोहित घोंगडे आदी उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या वतीने अशा उपक्रमांद्वारे समाजातील दुर्बल घटकांसाठी शाश्वत आणि सन्मान्य निवाऱ्याची उपलब्धता करून देण्याचा प्रयत्न होत आहे.

# अमरावतीत आजही पावसाचा जोर कायम गेल्या २४ तासांत ३६.४ मिमी पाऊस

## १२ जुलैपर्यंत रिपरीप सुरू राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**



गेल्या दोन दिवसांपासून अमरावतीसह जिल्ह्यात पावसाची रिपरीप सुरु आहे. हवामान खात्याने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार ही रिपरीप आगामी १२ जुलैपर्यंत कायम राहणार असून त्यानंतर काही दिवसांची उघडीप राहणार आहे. दरम्यान गेल्या २४ तासांत जिल्ह्यात ३६.४ मिलीमीटर पाऊस नोंदला गेला असून आतापर्यंतचा एकूण पाऊस १२७.७ मिलीमीटरवर पोचला आहे.

जिल्हा प्रशासनाने १ जून पासूनच्या या मोसमातील पावसाची मोजदाद केली आहे. या मोजदादनुसार एकूण पाऊस १२७.७ मिलीमीटरवर पोचला असला तरी तो सरासरी पासून अद्याप दूर आहे. महसूलच्या नोंदीनुसार आजपर्यंत जिल्ह्यात २१७.३ मिलीमीटर पाऊस पडायला हवा होता. परंतु बहुतेक तालुक्यात पावसाने सरासरी न गाठल्यामुळे अशी आकडेवारी समोर आली आहे.

८ जुलैच्या सकाळी झालेल्या नोंदीनुसार वरुड, अंजनगाव सुर्जी व चांदूर बाजार या तीन तालुक्यांनीच सरासरी ओलांडली. दरम्यान तिवसा व दर्यापुर हे दोन तालुके सरासरीपर्यंत पोचले आहेत. तिवस्यात आतापर्यंत १७८.१ मिलीमीटर पाऊस पडायला हवा होता. परंतु प्रत्यक्ष पडलेला पाऊस १७२.२ मिलीमीटर आहे, तर दर्यापुरमध्ये १५६.२ मिलीमीटर पडणे अपेक्षित असताना तो १५०.१ मिलीमीटरवर थांबला आहे.

**तीन तालुक्यांनी ओलांडली सरासरी**

जिल्ह्याच्या १४ तालुक्यांपैकी केवळ तीन तालुक्यांनी सरासरी ओलांडली आहे. यामध्ये वरुड, अंजनगाव सुर्जी व चांदूर बाजारचा समावेश आहे. वरुडमध्ये आतापर्यंत (८ जुलै) २०२.५ मिलीमीटर पाऊस अपेक्षित होता. प्रत्यक्षात तो २२४.९ मिलीमीटरवर पोचला आहे. अंजनगाव सुर्जी तालुक्यात १५८.३ मिलीमीटर पाऊस अपेक्षित असताना तेथील पर्जन्यमान १७०.२ मिलीमीटर नोंद झाले आहे, तर चांदूर बाजार तालुक्यात आतापर्यंत १८१.६ मिलीमीटर पाऊस नोंदला गेले. तेथील सरासरी पर्जन्यमान १६७.२ मिलीमीटर असते.

# कागदावरच झाली शतकोटी वृक्ष लागवड

## पर्यावरण प्रेमींची वृक्ष लागवड चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९चिखलदरा**

'शासनाने फक्त परिपत्रक काढायचे, की खरोखरच शतकोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट गाठायचे?' असा संतप्त सवाल आता मेळघाटातील जनतेकडून उपस्थित होत आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर शासकीय कार्यालये, वनविभाग, ग्रामपंचायतीकडून मोठ्या घोषणांचा गाजावाजा होतो. शतकोटी वृक्ष लागवडीचे उदात्त उद्दिष्ट जाहीर होते, परंतु प्रत्यक्षात हा सगळा प्रकार कागदोपत्रीच मर्यादित राहतो, अशी तिखट प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.



मेळघाटातील वास्तव वेगळेच चित्र दाखवते रोहयोंतर्गत चिखलदरा तालुक्यात हजारो मजूर वृक्षलागवड व संवर्धनासाठी कामावर घेतले जातात. नियमाप्रमाणे एका मजुराने वर्षभरात सुमारे २०० झाडांचे संवर्धन करायचे असते. यासाठी तीन वर्षाच्या देखभालीची तरतूद असतेः परंतु अनेक लोकांनी सांगितले की, ते केवळ हजेरीपुरतेच काम करतात. प्रत्यक्ष काम किंण झाडांचे पालन पोषण होत नसल्याने लागवड केलेल्या २०० झाडापैकी १०० ते १५० झाडे उन्हाळ्यात वाळून मरतात. यात आणखी गंभीर बाब म्हणजे काही मजूर स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करुन पुन्हा झाडे खरेदी करतात आणि ती लावतात कारण झाडे कमी राहिले, तर चौकशी झाली तर आपली हजेरी लागणार नाही. ना वनविभागाकडून तपासणी होते, ना ग्रामपंचायतीकडून किंवा पंचायत समितीकडून कोणतीच चौकशी होत नाही. परिणामी वृक्ष लागवडीच्या संपूर्ण मोहिमेवर पाणी फिरते.

**गेल्या कित्येक वर्षांत या प्रकरणात अनेक तक्रारी झाल्या**

वृक्ष लागवडीत गैरव्यवहार, मजुराची बनावट हजेरी, रोजगार सेवक वतांत्रिक सहायकांचे हात ओले होणे, या आरोपांची चर्चाच गावोगावी रंगतातः परंतु अद्याप किती मजुरांवर, रोजगार सेवकांवर किंवा तांत्रिक सहय्यकांवर कारवाई झाली.

हे विचारले असता कुणाकडेच ठोस आकडे नाहीत, मेळघाटातील नागरिक विचारत आहेत की, हे शतकोटी वृक्ष लागवडीचे परिपत्रक काढून शासन केवळ आपली पाठ थोपटून घेणार का? की प्रत्यक्ष कामावर लक्ष ठेवून दोषींवर कारवाई करणार? या पार्श्वभूमीवर मेळघाटातील वृक्ष लागवडीच्या कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिकांनी पुन्हा एकदा जोरात केली आहे, अन्यथा शतकोटी वृक्ष लागवड ही योजना केवळ सरकारी कागदांपुरतीच राहील असा इशारा ही पर्यावर्णप्रेमींनी दिला आहे.

# चांदूर रेल्वेत संततधार पावसामुळे वृद्ध महिलेच्या घराची भिंत कोसळली



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९चांदुर रेल्वे**

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे येथे मध्यरात्री हृदयद्रावक घटना घडली.

स्थानिक मुक्ताबाई मरसकोल्हे (वय ७५) या वृद्ध महिला रात्री साधारण २ वाजताच्या सुमारास गाढ झोपेत असताना त्यांच्याच घराची भिंत अचानक कोसळली. सुदैवाने त्यांना कोणतीही शारीरिक इजा झाली नाही, मात्र त्यांच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाचे पाणी घरात घुसल्याने जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य पूर्णतः भिजले असून वृद्ध महिलेचा संसार अक्षरशः उघड्यावर आला आहे.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला तात्काळ भेट देऊन पाहणी करण्याचे आणि त्वरित मदत करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाकडून त्वरीत हालचाल न झाल्यास जनआंदोलन छेडण्याचा इशारा काही नागरिकांनी दिला आहे.या घटनेमुळे चांदूर रेल्वे परिसरात चिंता आणि भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

# रतन इंडिया प्रकल्पातील निशुल्क राखेबाबत अजूनही निर्णय नाही

## कोराडी-मौदा धर्तीवर अमरावती जिल्हाधिकारी केव्हा निर्णय घेतील? व्यावसायिकांचा सवाल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नांदगाव पेठ**

नांदगाव पेठ एमआयडीसीतील रतन इंडिया औष्णिक वीज प्रकल्पाकडून निघणाऱ्या कोळशाच्या राखेबाबत अजूनही निशुल्क वितरणाचा ठोस निर्णय झालेला नाही. यामुळे परिसरातील वीटभट्टीधारक आणि विविध औद्योगिक घटकांत नाराजी आहे. कोराडी व मौदा येथील ऊर्जा प्रकल्पांनी स्थानिकांना राखेचा निशुल्क लाभ दिला असून, त्याच धर्तीवर अमरावती जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

सध्या रतन इंडिया प्रकल्पातून दररोज मोठ्या प्रमाणावर कोळशाची राख निर्माण होत असून, ती वाहतुकीसाठी खासगी ठेकेदारांमार्फत विकली जाते. मात्र ही प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा आरोप अनेकांनी केला आहे. परिणामी, स्थानिक व्यावसायिकांना योग्य दराने वा निशुल्क राख मिळत नसल्याने त्यांचा मोठा आर्थिक फटका बसत आहे.स्थानिक व्यावसायिक, वाहतूकदार, ट्रान्सपोर्ट असोसिएशनने प्रशासनाकडे यासंबंधी वारंवार निवेदने दिली असूनही अद्याप कुठलाही ठोस निर्णय झालेला नाही.

दुसरीकडे, कोराडी आणि मौदा प्रकल्पांमध्ये जिल्हा प्रशासनाने हस्तक्षेप करून स्थानिक गरजूंना राखेचा निशुल्क लाभ मिळवून दिला आहे. शिवाय शासकीय व निमशासकीय प्रकल्पात राख वापरण्यास प्रति टन १२५ रुपये अनुदान देखील देण्यात आले आहे. त्यामुळेच अमरावती जिल्हाधिकारी यांनी देखील तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी व्यावसायिक व वाहतूकदार यांनी केली आहे.जर लवकरात लवकर निर्णय झाला नाही, तर रतन इंडिया समोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा काही सामाजिक संघटनांनी दिला आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत गांभीर्याने पावले उचलणे गरजेचे ठरत आहे.

**पर्यावरण व आर्थिक नुकसान टळेल**

राखेचा वापर वीटभट्ट्या, सिमेंट व बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होतो. निशुल्क राख उपलब्ध झाल्यास स्थानिक उद्योजक आणि वाहतूकदार यांचे खर्च कमी होतील तसेच पर्यावरणीय नुकसानही टळू शकेल.

# अमरावतीत भर पावसात महिला कामगारांचा मोर्चा

## अमरावतीत देशव्यापी संपाला पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**





आज देशव्यापी संपाच्या निमित्ताने अमरावतीत देखील संयुक्त कामगार संघटनेच्या वतीने अमरावतीच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर महिला कामगारांनी मोर्चा काढला, यावेळी हजारो महिला यावेळी भर पावसात छत्री घेऊन या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या,

तत्पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोलिसांनी बॅरिकेट लावून मोर्चा अडवला... कामगार विरोधी चार श्रम संहिताच्या विरोधात हा एल्गार करण्यात आला, कॉर्पोरेट मालकांचे हितांचे व कामगार कर्मचारी यांना गुलामगिरी टाकणारे चार श्रमसंहिता रद्द करा, जनतेच्या लोकशाही, अधिकारावर, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि आपल्या न्याय मागणीसाठी लढण्याचा हक्कावर गदा आणणारे महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक मागे घ्या, बारमाही कायमस्वरूपी कामांच्या ठिकाणी कंत्राटीकरण बंद करा, सर्व कामगारांना २६ हजार रुपये किमान वेतन व दहा हजार रुपये पेन्शन लागू करा, आशा वर्कर,शालेय पोषण आहार, कंत्राटी डॉक्टर नर्सेस यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या यास असंख्य मागण्यासाठी यावेळी मोर्चा काढण्यात आला, केंद्र व राज्य सरकारने तातडीने दाखल घ्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# अपूर्ण अंडरपास नागरिकांचे जीवघेणे संकट

## पार्डी देवी रेल्वे क्रॉसिंग बंद; गुडघाभर पाण्यातून नागरिक,विद्यार्थ्यांची कसरत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अंजनगाव बारी**

पार्डी देवीजवळील अपूर्ण असलेल्या रेल्वे अंडरपासमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. रेल्वे विभागाने पारंपरिक रेल्वे क्रॉसिंग बंद करून अंडरपास खुला केला असला, तरी तो अपूर्ण असून त्यात साचलेल्या गुडघाभर पाण्यामुळे नागरिक आणि शाळकरी विद्यार्थी अक्षरशः अडकले आहेत.

मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे



अंडरपासात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. याच पाण्यातून अनेक विद्यार्थी शाळेत जाण्याचा प्रयत्न करत होते, मात्र काहींना अर्ध्या वाटेतून परत घरी जावे लागले.

काल रात्री काही दुचाकीस्वार या अंडरपासात पडलेल्या पाण्यात अडकले. काही दुचाकी पाण्यात कोसळल्याने वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला.स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, प्रशासनाच्या उदासीनतेवर टीका होत आहे.

**नागरिकांची प्रमुख मागणी**

अंडरपासातील पाणी त्वरित उपसावे, पर्यायी मार्ग खुला करावा, अंडरपास पूर्ण होईपर्यंत रेल्वे क्रॉसिंग पुन्हा सुरू करावे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. दररोज या पाण्यातून वाट काढतांना जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागतो. प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी एका स्थानिक नागरिकाने केली.

# शाडू मातीच्या निर्णय धरसोडीचा; पारंपरिक मूर्तिकारांवर परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींना बंदीची घोषणा करण्यात आली त्यानंतर पुन्हा ही बंदी हटविण्यात आली.

पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींना बंदीची घोषणा करण्यात आली त्यानंतर पुन्हा ही बंदी हटविण्यात आली. यामुळे अमरावती शहरात वर्षानुवर्षे पारंपरिक शाडू मातीच्या मूर्तिकारावर नवे संकट आले आहे. यात शाडू मातीच्या एका गोणीमागे दहा रुपयांची वाढ झाल्याने त्याचा भारही वाढला आहे. त्यामुळे सरकारने निश्चित काय तो निर्णय घेऊन मेहनतीने शाडूच्या मूर्ती बनविणाऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली जात आहे.

अमरावती शहरात गेल्या कित्येक पिढ्यांपासून मातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याचे काम केले जाते. सध्या येथील कारखान्यात शाडू मातीच्या मूर्ती बनविण्याच्या कामाची लगबग सुरू आहे. गणेशोत्सवाच्या



पार्श्वभूमीवर चार महिने आधीच येथील मूर्तिकार गणेशमूर्ती तयार करण्याच्या कामाला सुरुवात करतात. शहरात बाहेरून रंगकाम केलेल्या तयार गणेशमूर्ती विक्रीसाठी येत असल्याने, येथील पिढीजात मूर्तिकारांच्या व्यवसायावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. येथील पिढीजात कुंभार समाजाच्या मूर्तिकारांचे ग्राहक वर्षागणिक रोडावत चालले आहेत. त्यामुळे येथील मूर्तिकरांचा व्यवसाय अडचणीत आला आहे.

खेड्यापाड्यात गणेशमूर्तींच्या विक्रीची दुकाने थाटली गेली असल्यामुळे, नव्या ग्राहकांबरोबर जुने ग्राहकही मोठ्या प्रमाणावर कमी झाले असल्याची खंत येथील मूर्तिकारांनी व्यक्त केली.

# डॉक्टरने भर रस्त्यावर स्वतःला पेटवून घेतले! नांदुरा परिसर हादरला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९बुलढाणा**

एका उच्च शिक्षित व्यक्तीने भर वाहतुकीच्या मार्गावर स्वतःला पेटवून घेतले. यावेळी उपस्थित नागरिकांनी धाडस दाखवून आग विझविली असली तरीही स्वतःला पेटवून घेणाऱ्या इसमाची प्रकृती गंभीर असून तो उपचारदरम्यान मृत्यूशी झुंज देत आहे.

नांदुरा तालुक्यासह बुलढाणा जिल्ह्याला हादरविणारी ही घटना नांदुरा तालुक्यात घडली आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या घाटाखालील भागातील भर वाहतुकीच्या नांदुरा ते जळगाव जामोद मार्गावर हा थरारक अन तितकाच दुर्दैवी घटनाक्रम घडला. बुलढाणा जिल्ह्यातील



नांदुरा ते जळगाव या रस्त्यावरील आलमपुर फाट्यावर आज नेहमीप्रमाणे प्रवासी, प्रवासी वाहतूक करणारी वाहने, फाट्यावरील लहान सहान दुकानें ग्राहकांनी गजबजलेली होती.

गडबडी ची वेळ असल्याने दररोज प्रवास ( अप डाऊन) करणारे कर्मचारी, कामगार, विदयार्थी याने आलमपूर फाटा गर्दीने फुलला होता. या दैनंदिन धामधूमीत तिथे आलेल्या एका व्यक्तीने सोबत आणलेले ज्वालाग्रही ( पेट्रोल) द्रव्य पदार्थ स्वतःच्या अंगावर ओतून घेतले. यामुळे तो उभा पेटला. कुणाच्या ध्याना मनात नसताना अचानक झालेल्या अभूतपूर्व प्रकाराने उपस्थित गावकरी, प्रवासी थक्क झाले.

दरम्यान काही धाडसी गावकर्यांनी हिम्मत दाखवून उभ्या पेटलेल्या व्यक्तीच्या अंगावर पाण्याचा मारा केला. त्यामुळे काही वेळाने आग विझली. मात्र तोपर्यंत तो इसम गंभीर रित्या भाजल्या गेला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले.